# प्रेसनोट

जा.क्र. ४६४ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०७/२०१७

## "मोबाईल पोलीस स्टेशन"
## (फिरते पोलीस स्टेशन)

भंडारा:— पोलीस विभाग भंडारा चे वतीने भंडारा जिल्हात पोलीस अधीक्षक,भंडारा श्रीमती विनीता साहू यांचे संकल्पनेतून "मोबाईल पोलीस स्टेशन" (फिरते पोलीस स्टेशन) यापुढे भंडारा जिल्हातील सर्व पोलीस स्टेशन अंर्तगत आठवडयाचे प्रत्येक शनिवारी 'मोबाईल पोलीस स्टेशन' ची मोहीम राबविण्यात येत आहे. दिनांक ०१/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हातील पोलीस स्टेशन १) पवनी (गायडोगरी ), २) अडयाळ (सोनेगाव चित्त ),३) जवाहरनगर (खरबी ), ४) भंडारा ( बेला ), ५) मोहाडी (पारडी ), ६) आंधळगाव (वडेगाव), ७) तुमसर (सालई), ८) सिहोरा (पिंपरी जुन्नी) ९) साकोली (पाथरी), १०) लाखनी (नानोरी/दिघोरी ), ११) पालांदुर (ढिवरखेडा), १२) लाखांदुर ( मासळ), १३) गोबरवाही (डोंगरी बुज), १४) दिघोरी (खोलमारा), १५) कारधा (करचखेडा), १६) वरठी (बोथली), १७) करडी (जांभोरा) याठिकाणी उत्कृष्टपणे राबविण्यात आलेली आहे. सदर मोहीमेत पोलीस स्टेशन मधिल अधिकारी व कर्मचारी तसेच गावातील पोलीस पाटील, सरपंच, पोलीस मित्र, माहात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष/सदस्यगण व सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक आणि आजुबाजूचे गाव/परीसरातील सर्व नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिलेला आहे. सदर मोहीमेत नागरीकांच्या एकुण ०२ तक्रारी नोंदविल्या असून तक्रारीचे निराकरण करण्यात आलेले आहे.


सपोनी. वी.डी. कोडापे
नियंत्रण कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र ९७६४३८२२१४


प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.